-१०२-

पाणी पुरवठा योजनेखालील जमिनी आणि
पाणी पुरवठ्याकरीता टाकण्यात आलेल्या
जलवाहिन्याखालील जमिनीवर अकृषिक
आकारणी करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
शासन परिपत्रक क्रमांक एनएए १९८९/१४७५०/[२८]/ल-५
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक ७ जुलै, १९९५.

शासन परिपत्रक :-

महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ११७ आणि
महाराष्ट्र जमिन महसूल [जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी] नियम,
१९६९ मधील नियम २२ मध्ये पाणी पुरवठा योजना खालील जमिनी आणि पाणी
पुरवठ्यासाठी वापरण्यात येत असलेल्या जलवाहिन्याखालील जमिनीवर अकृषिक
आकारणी करण्यापासून सूट देण्यात आलेली नाही. तथापि, कांही महानगरपालिका
व नगरपालिका तशी आकारणी करीत नसल्याचे महालेखाकार महाराष्ट्र राज्य,
नागपूर यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले. पाणी पुरवठ्याची बाब ही
अत्यावश्यक आणि सार्वजनिक महत्वाची असल्यामुळे या योजनाखालील जमिनीवर
आणि जलवाहिन्याखालील जमिनीवर अकृषिक आकारणी करु नये, अशी विनंती
मुंबई महानगरपालिकेने सन १९८१ मध्ये केली होती. याबाबत सर्वंकष विचार
करुन मुंबई महानगरपालिकेची विनंती नामंजूर करण्यात आली व तसे महानगरपालिकेला
शासन पत्र महसूल व वन विभाग क्र. एनएए २६८२/२७६१९९/ल-२, दिनांक १८
डिसेंबर, १९८२ अन्वये उत्तर देण्यात आले. तदनंतर मुंबई महानगरपालिकेने
शासनाकडे पुन्हा अर्ज करुन उपरोक्त प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या
जमिनीवर अकृषिक आकारणी करु नये; अशी विनंती केली. सदर विनंतीच्या
अनुषंगाने शासनाने दिनांक १८ डिसेंबर, १९८२ च्या पत्राला स्थगिती दिली.
मध्यंतरीच्या कालावधीत राज्यातील कांही नगरपालिकांनी तसेच महाराष्ट्र
पाणीपुरवठा व जलनिःस्सारण मंडळ वगैरे पाणीपुरवठा करणाऱ्या स्थानिक स्वराज्य
संस्था, मंडळे व महामंडळे यांनी पाणीपुरवठा योजनेखालील जमिनीवर अकृषिक
आकारणी करु नये अशी शासनाला विनंती केली होती. त्यांच्या विनंतीचा
कायदेशीर तरतुदींचे अवलोकन करुन आणि सर्वंकष विचार करुन अशा योजना खालील
जमिनींना अकृषिक आकारणीतून सूट देता येणार नाही, असा निर्णय शासनाने
घेतला आहे.

कृ.मा.प.

२. उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने सर्व विभागीय आयुक्त आणि सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा, महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनि:सारण मंडळ, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळ व इतर पाणीपुरवठा करणा-या संस्था, स्वायत्त संस्था, मंडळे व महामंडळे यांच्या पाणी पुरवठा योजनेखालील जमिनीवर महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ११४[ड] नुसार"कोणत्याही इतर कारणासाठी" असे प्रयोजन समजून अकृषिक आकारणी करावी. सदरची आकारणी पाणीपुरवठा योजना सुरु झाल्यापासून करण्यात यावी व त्यानुसार थकबाकीची वसूली करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ चं. वा. शिरवले ]
अवर सचिव,
महसूल व वन विभाग.

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी
17 JUL 1995
शाखा-
म. जि. उ. जि. जिल्हाधिकारी